नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/08/2023 (शुक्रवार) दुपार

## चोरी

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत २० कि.मी. अंतरावरील मौजा महालगाव शिवार येथे दिनांक ०९/०८/२०२३ चे २२/०० वा. ते दिनांक १०/०८/२०२३ चे ०६/०० वा. सुमारास फिर्यादी नामे– चिराग गतसिंग भवेदी, वय ३४ वर्ष, कंवाडोगरी तह, मोहगाव, जि. मंडला मध्यप्रदेश हा महालगाव येथील कंपनीच्या कॉर्टरवर राहत होता. फिर्यादी जेवन करून झोपले असता दिनांक १०/०८/२०२३ चे सकाळी ६/०० वा. उठुन पाहिले तर १) विवो कंपनीचा मोबाईल किंमती अंदाजे ५०००/–रू २) कॉम्पेक कंपनीचा लॅपटॉप किंमती अंदाजे १००००/–रू ३) नगदी ३०,०००/–रू एकुण किंमती अंदाजे ४५०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मोहोड हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. अरोली** :– दिनांक १०/०८/२०२३ चे ११.१५ वा. ते १३.०० वाजता दरम्यान पिडीत फिर्यादी ही आपले शेतामध्ये एकटीच काम करित असता यातील **आरोपी नामे– राहुल राधेशाम परतेती, वय ३६ वर्ष, रा. विरशी ता. मौदा जि. नागपुर** हा फिर्यादीला पाणी आहे का असे विचारले असता फिर्यादीने हो असे म्हटले व आरोपीने पाणी पिले व तो तिथुन निघुन गेला. नंतर फिर्यादी ही शेतातील धुऱ्याची खांड बांधत असता अचानक फिर्यादी समोर एक ईसम हा तोंडाला साडीच्या कपडयाने झाकलेला होता त्याने फिर्यादीचा डावा हात पकडुन मागे सरकवत नेवुन खाली पाडले. फिर्यादीचा विनयभंग केला. फिर्यादीने आपल्या हातातील विळयाने त्या ईसमाचा चेहऱ्यावरचा कपडा बाजुला केला असता फिर्यादीला समजले की हा गावातीलच राहुल राधेशाम परतेती आहे. फिर्यादीने आपल्या दोन्ही हाताने धक्का दिला असता आरोपी हा बाजुला झाला व तिथुन फिर्यादी ही धावत घराकडे निघुन आली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ अ २, ३५४ ब भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक फुलेकर मो. न. ७५८८५६४३०० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर